| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| MHNG020050282022 | दाखल दिनांक | | १३.०९.२०२२ | | |
| | नोंदणी दिनांक | | १४.०९.२०२२ | | |
| | निकाल दिनांक | | १३.०७.२०२६ | | |
| | कालावधी | | व.०३ | म.०९ | दि.२९ |

| | |
|---|---|
| **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, नागपूर यांचे न्यायालयात**<br>**(पिठासीन न्यायाधीश श्री एम.के.पाटील )** | |
| **नियमीत दिवाणी दावा क्र.१२०३/२०२२** | **निशाणी क्र.६०** |

| | | |
|---|---|---|
| **वादी –** | | **श्री. प्रणय रविंन्द्र टाकळीकर,**<br>वय– २० वर्षे, कामधंदा–शिक्षण,<br>रा. घर नं.२२२०, नवीन बिनाकी मंगळवारी, कांजी घर चौक, नागपूर. |
| **वादीचे वकील –** | | **श्री. ए.एच.खान** |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| **प्रतिवादी –** | १. | **श्री. नारायण चैतराम कुंभारे,**<br>वय– ५२ वर्षे, धंदा– व्यवसाय,<br>रा. निकुंज विद्यालय जवळ, हनुमान मंदिर, आनंद नगर, बिनाकी मंगळवारी, कांजी घर चौक जवळ, नागपूर. |
| | २. | **श्रीमती. शशी नारायण कुंभारे,**<br>वय– ५० वर्षे, कामधंदा–गृहीणी,<br>रा. घर नं. २२२०, नवीन बिनाकी मंगळवारी, कांजी घर चौक जवळ, नागपूर. |
| | ३. | **कु. टिना रविंन्द्र टाकळीकर,**<br>वय–१६ वर्षे, धंदा– शिक्षण,<br>तर्फे<br>शशी नारायण कुंभारे,<br>रा. घर नं.२२२०, नवीन बिनाकी मंगळवारी, कांजी घर |

| | | |
|---|---|---|
| | | चौक, नागपूर. |
| **प्रतिवादी क्र.१ चे विधीज्ञ–**<br>**प्रतिवादी क्र. २ व ३ चे विधीज्ञ–** | | **श्री. व्ही.के.गवरे**<br><br>**शाहीद रजा, एम.डी. गायकवाड** |

| | |
|---|---|
| **दावा –** | **जाहीरनामा, मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यासाठी व निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी .** |

## न्यायनिर्णय
## (दिनांक १३.०७.२०२६ रोजी घोषित)

प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी दावा मिळकतीबाबत झालेले खरेदीखत क्र.४२३२/१४ हे बेकायदेशीर असल्याचे व ते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळण्यासाठी, प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकत हस्तांतरीत करु नये व दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जास हरकत करु नये असा निरंतर मनाई हुकुम मिळण्यासाठी व दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यासाठी दाखल केला आहे.

**वादीच्या दाव्याची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२. मौजा–बिनाकी, ता.जि. नागपूर येथील नवीन बिनाकी मंगळवारी, कांजी हाऊस चौक, येथील वार्ड नं. ४३, सि.स.नं. २३५५, शिट नं. ४४०/२९ मधील नगरपालिका घर क्र. २२२० मधील दोन मजली पक्के घर ज्याचे एकुण क्षेत्र २५८.८७ चौ.फुट असून त्यांच्या उत्तरेस–श्री. दिघोरीकर यांचे घर, पुर्वेस व दक्षिणेस– रस्ता व पश्चिमेस लोकमत खांडारे यांचे घर असून सदरील मिळकत ही प्रस्तुत दाव्यातील दावा मिळकत आहे. वादी हा प्रतिवादी क्र.२ यांचा मुलगा आहे. प्रतिवादी क्र. ३ ही वादी

यांची बहीण आहे. प्रतिवादी क्र. १ ही प्रतिवादी क्र.२ यांची दुसरी दुसरी पत्नी आहे. वादी यांचे वडील व प्रतिवादी क्र.२ यांचे पहिले पती रविंन्द्र टाकळीकर हे दि. १२.०९.२०११ रोजी मयत झाले असून वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत. प्रतिवादी क्र. २ यांनी वादी यांच्या वडीलांच्या मृत्यूनंतर प्रतिवादी क्र.१ यांच्या बरोबर दुसरा विवाह केला. वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ हे दावा मिळकतीमध्ये राहत आहे. दावा मिळकत ही वादी यांचे वडील रविंन्द्र टाकळीकर यांच्या मालकीची होती. दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/३ हिस्सा प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्याशी दुसरा विवाह केल्यामुळे दावा मिळकतीमध्ये त्यांना कायदयानुसार कोणताही हक्क राहिलेला नाही. त्यामुळे दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ यांना १/३ हिस्सा आहे. प्रतिवादी क्र.२ यांचा प्रतिवादी क्र.१ यांच्या बरोबर विवाह होण्यापूर्वी प्रतिवादी क्र.२ या वादी व प्रतिवादी क्र.३ यांची योग्यरित्या देखभाल करत होते. परंतु, प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या सोबत दुसरा विवाह केल्यानंतर त्यांच्या वर्तनुकीमध्ये बदल झाला. तसेच, त्यानंतर प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमध्ये येत होते. वादी व प्रतिवादी क्र. ३ हे शिक्षण घेत आहेत. प्रतिवादी क्र.२ या प्रतिवादी क्र. ३ या सज्ञान नसतांना त्यांची देखभाल करत होते. प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकत हडप करण्याच्या उद्देशाने प्रतिवादी क्र.२ यांचा गैरफायदा घेवुन व त्यांच्यावर दबाव टाकुन दावा मिळकतीचे खरेदीखत नं. ४१३२/१४ हे स्वतःच्या हक्कात दि. ०३.०७.२०१४ रोजी करुन घेतले आहे. सदरील खरेदीखताची माहीती वादी यांना ऑगस्ट २०२२ मध्ये सदरील खरेदीखताची प्रत नगरभुमापन कार्यालयातून काढल्यानंतर झाली. त्यानंतर वादी यांना दावा मिळकतीस सदरील खरेदी खतानुसार प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाचा फेरफार मंजूर झाल्याचे समजले. त्यानंतर प्रतिवादी यांना त्याबाबतीत धक्का बसला. सदरील खरेदीखत झाले त्यावेळी

वादी व प्रतिवादी क्र. १ हे कायदयाने सज्ञान नव्हते. सदरील खरेदीखताची माहीती झालेनंतर वादी यांनी त्यांच्या वकीलांची मदत घेतली. प्रतिवादी क्र. २ यांना वादातील खरेदीखत करुन देण्याचा कोणताही कायदेशीर अधिकार नाही. वादी हे दावा मिळकतीचे कर नियमित भरत आहेत. वादातील खरेदीखत हे बेकायदेशीर असून ते वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्यावर बंधनकारक नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना दि. ०६.०९.२०२२ रोजीची नोटीस पाठवून वादातील खरेदीखत हे बेकायदेशीर असल्याचे व त्या आधारे दावा मिळकतीमध्ये त्रयस्त व्यक्तीचा हितसंबध निर्माण करु नये व दावा मिळकतीस त्यांच्या कब्जास हरकत करु नये असे कळविले. प्रतिवादी क्र. १ यांनी दि. २८.०८.२०२२, ३०.०८.२०२२ व ०९.०९.२०२२ रोजी वादी यांना दमदाटी करुन दावा मिळकतीचा ताबा बळजबरीने घेण्याचा प्रयत्न केला. दावा मिळकतीशी प्रतिवादी क्र. १ व २ यांचा काहीही संबध नाही. तसेच, वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द पोलीसांकडे तक्रार केली परंतु, पोलीसांनी त्यांची दखल घेतलेली नाही. त्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करण्यास कारण घडले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली.

३. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांची कैफियत ही नि. १४ वर दाखल करुन त्यामध्ये त्यांनी वादी व इतर प्रतिवादी व त्यांच्यामध्ये असलेले जे नातेसंबध नमुद केले आहेत व दावा मिळकतीचे वर्णन मान्य केले आहे त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत दाव्यात त्यांच्या विरुध्द करण्यात आलेले सर्व आरोप नाकारले. त्यामध्ये त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी क्र.३ हे सज्ञान नसल्यामुळे व त्यांना आर्थिक अडचण असल्यामुळे प्रतिवादी क्र. २ यांनी दावा मिळकत ही त्यांच्या कायदेशीर गरजेसाठी प्रतिवादी क्र.१ यांना विक्री केली असून प्रतिवादी क्र. १ यांनी ते दावा मिळकत स्वतःच्या उत्पन्नातुन खरेदी केली आहे. सदरील खरेदीखतामध्ये नमुद

मोबदल्याची पुर्ण रक्कम प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र.२ यांनी दिली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांचा दावा मिळकत हडप करण्याचा कोणताही उद्देश नसल्याचे दिसून येते. तसेच, वादातील खरेदीखत हे कायदेशीर असल्यामुळे वादी यांना प्रस्तुतचा दावा दाखल करण्याचा अधिकार नाही. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना जी नोटीस पाठवलेली होती त्यास प्रतिवादी क्र.१ यांनी नोटीस उत्तर हे वादी यांना दिले असून ते वादी यांना मिळालेले आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात नमुद केले प्रमाणे प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द मनाई हुकुम मागण्याचा अधिकार नाही. प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकतीचे मालक झाले असून त्यांना दावा मिळकतीचा उपभोग घेण्याचा कायदेशीर अधिकार आहे. वादी हे दावा मिळकतीमध्ये राहत नसून ते त्यांच्या आजी सोबत राहतात व त्यांच्या सोबत प्रतिवादी क्र. ३ ही देखील राहते. तसेच, वादी यांनी केवळ प्रतिवादी क्र. १ यांना त्रास देण्यासाठी पोलीसांकडे प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द तक्रार दाखल केली असून पोलीसांनी त्यांची दखल घेतलेली नाही. वादातील खरेदीखत हे वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्या कल्याणाकरता करण्यात आले असल्यामुळे दावा मिळकतीमधील वादी यांचा हक्क संपुष्ठात आला आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्याचे मुल्यांकन योग्यरित्या केलेले नाही. वादातील खरेदीखत हे प्रतिवादी क्र. २ यांनी वादी व प्रतिवादी क्र. ३ यांच्या वतीने प्रतिवादी क्र. १ यांना करुन दिले आहे. वाद मिळकतीचे मुळ मालक निळकंठ टाकळीकर होते. त्यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकतीस त्यांची पत्नी कमलाबाई व इतर वारस प्रभाकर, रविंन्द्र, निर्मला उर्फ बबिता यांचा नावाचा फेरफार मंजूर झाला. त्यामधील प्रभाकर हा अविवाहीत मयत झाला व दावा मिळकतीवरुन त्याचे नाव कमी करण्यात आले. रविंन्द्र यांचे मृत्यूनंतर दावा मिळकतीस प्रतिवादी क्र. २ व त्यांची दोन मुले म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र. ३ यांच्या नावाचा फेरफार मंजूर झाला आहे. रविंन्द्र टाकळीकर यांच्या आईने दावा मिळकतीमधील तिचा

हक्क हा प्रतिवादी क्र. २, ३, वादी व निर्मला उर्फ बबिता दिघोरिकर यांच्या हक्कात सोडून दिला आहे. त्यामुळे सदरील रविन्द्र यांची आई कमलाबाई यांचे नाव दावा मिळकतीमधून कमी करण्यात आले आहे. त्यानंतर दावा मिळकतीचे वाटप हे वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ व निर्मला दिघोरिकत यांच्यामध्ये सन २०१३ मध्ये झाले असून ते नोंदणीकृत करण्यात आले आहे. सदरील वाटपानंतर वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ हे दावा मिळकतीचे कायदेशीर मालक झाले. वादी व प्रतिवादी क्र. ३ हे सज्ञान नसल्यामुळे वादातील खरेदीखत हे त्यांच्या वतीने अज्ञान पालन कर्ता म्हणून त्यांची आई म्हणजेच प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना करुन दिले आहे. सदरील वादातील खरेदीखतानुसार दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.१ यांच्या नावाचा फेरफार मंजूर झाला आहे. सदरील खरेदीखत झाल्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्या बरोबर दि. ०४.०८.२०१४ रोजी विवाह केला. परंतु, प्रतिवादी क्र. १ हे त्यापूर्वीच विवाहीत असल्यामुळे व त्यांची पहिली पत्नी हयात असल्यामुळे सदरील प्रतिवादी क्र. २ व १ यांच्यामध्ये झालेला विवाह हा कायदेशीर नाही. दावा मिळकतीमधील घरामध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी भाडेकरु ठेवला असून त्यांचे भाडे घेत आहेत. सदरील भाडयाच्या रक्कमेवर प्रतिवादी क्र. १ यांचा हक्क आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांना जी नोटीस पाठवली आहे ती वस्तुस्थितीवर आधारीत नसून सदरील नोटीस वादी यांना केवळ प्रतिवादी क्र.१ यांची समाजामध्ये बदनामी करण्याच्या उद्देशाने पाठविली आहे. वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ यांना दावा मिळकतीमध्ये राहण्याचा अधिकार नाही. तसेच, वादी व प्रतिवादी क्र. ३ हे दावा मिळकतीमध्ये राहत नाहीत. त्यामुळे वादी व प्रतिवादी क्र. ३ यांना दाव्या मिळकतीमध्ये येण्याचा अधिकार नाही. त्यामुळे प्रस्तुतचा दावा खारीज करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

४. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांची कैफियत ही नि. १६ वर दाखल केली आहे. त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत दाव्यात नमुद त्यांचे वादी व प्रतिवादी क्र.१ यांच्यामधील नातेसंबध व दावा मिळकतीचे वर्णन मान्य केले आहे. त्यामध्ये त्यांनी प्रस्तुत दाव्यातील परिच्छेद क्र. ४ ते ७ मधील मजकुर नाकारलेला नाही. तसेच, त्यांनी प्रस्तुत दाव्यातील परिच्छेद क्र. १० व १२ मधील मजकुर मान्य केला आहे. तसेच, त्यांनी त्यामध्ये प्रतिवादी क्र. २ या दावा मिळकतीच्या सह मालक नसल्याचे जे प्रस्तुत दाव्यात नमुद केले आहे ते नाकारले नाही. तसेच, त्यांनी त्यामध्ये प्रतिवादी क्र.२ यांचा प्रतिवादी क्र.१ यांच्या बरोबर वाद झाल्यानंतर प्रतिवादी क्र.२ यांच्या वर्तनुकीत बदल झालेबाबत प्रस्तुत दाव्यात नमुद केलेला मजकुर नाकारलेला आहे. त्यामध्ये त्यांनी पुढे असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र.२ यांचे पती व वादी व प्रतिवादी क्र.३ यांचे वडील श्री. रविन्द्र टाकळीकर हे दि. १२.०९.२०११ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी क्र. १ हे सदरील रविंन्द्र टाकळीकर हे मयत झाले नंतर प्रतिवादी क्र.२ यांना भेटून त्यांना आर्थिक मदत करण्याचा प्रस्ताव देत होते. त्यामुळे प्रतिवादी क्र. १ व २ यांच्यामध्ये विश्वासाचे संबध निर्माण झाले. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र.२ यांना विवाहाचा प्रस्ताव दिला. त्यावेळी प्रतिवादी क्र. १ यांनी ते प्रतिवादी क्र. २ व त्यांचे दोन मुले वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचा योग्य सांभाळ करतील अशी खात्री प्रतिवादी क्र.२ यांना दिली. प्रतिवादी क्र. २ यांना मालमत्ता हस्तांतरण अधिनियम व इतर कायदेशीर तरतुदीचे ज्ञान नव्हते. तसेच, त्यांना मिळकत ही वादी व प्रतिवादी क्र. २ यांच्या वतीने विक्री करण्याचा अधिकार हा न्यायालयाच्या परवानगी शिवाय नसल्याची माहीती नव्हती. वादातील दावा मिळकतीचे खरेदीखत हे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र. २ यांची दिशाभुल करुन व त्यांना चुकीचे मार्गदर्शन करुन घेतले आहे. सदरील खरेदीखत करुन देण्यामागे प्रतिवादी क्र. १ यांचा दावा

मिळकत हडप करण्याचा गैर हेतू असल्याचे दिसून येते. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी जे दिलासे मागितले आहेत ते योग्य आहेत. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादी व प्रतिवादी क्र. ३ यांचा विचार करुन मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

५. प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांचेमार्फत वादी तर्फे साक्षीदार क्र.१ –प्रणय रविंन्द्र टाकळीकर– वादी यांनी त्यांचे स्वतःचे पुरावाशपथपत्र दाखल करुन नि. २३ वर तपासले आहे. वादी यांनी प्रस्तुत दाव्यात खालील कागदपत्रांचा आधार घेतला आहे–

१. दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रक – निशाणी २६,
२. दावा मिळकतीची कर पावती –निशाणी २७,
३. प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द यशोधरा नगर पोलीस स्टेशन व नगर भुमापन अधिकरी–२ नागपूर यांच्याकडे दिलेल्या दि. २९.०८.२०२२ रोजीच्या तक्रारीची स्थळप्रत – निशाणी २८ व २९,
४. प्रतिवादी क्र. १ व २ यांना पाठविलेल्या नोटीसची स्थळप्रत, पोस्टाच्या पावत्या व पोहचपावत्या– निशाणी ३० ते ३२,
५. वादी यांनी दिलेली यशोधरा नगर पोलीस ठाणे येथे दिलेल्या अदखलपात्र तक्रार क्र. ११६७/२०२२ ची छायांकित प्रत –आर्टिकल–ए,
६. दावा मिळकतीचे खरेदीखत क्र.४१३२/२०१४ ची सत्यप्रत– निशाणी ३३, व
७. प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना दिलेले दि. १२.०९.२०२२ रोजीचे नोटीस उत्तर– निशाणी ३४.

प्रस्तुत दाव्यात वादी यांनी त्यांचा पुरावा नि.२० वरील पुरसीस नुसार बंद केला.

६. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांचेमार्फत प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१–नारायण चैतराम कुंभारे– प्रतिवादी क्र.१–यांनी त्यांचे स्वतःचे पुरावाशपथपत्र दाखल करुन नि. ४२ वर तपासले आहे. प्रतिवादी क्र.१ यांनी प्रस्तुत दाव्यात खालील कागदपत्रांचा आधार घेतला आहे–

१. दावा मिळकतीचे खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ ची प्रमाणित प्रत– निशाणी ४७,

२. दावा मिळकतीचे नामांतर इतलाची प्रमाणित प्रत– निशाणी ४८,

३. प्रतिवादी क्र.१ व प्रतिवादी क्र.२ यांना देण्यात आलेली फेरफारबाबतची सुचनेची प्रमाणित प्रत – निशाणी ४९,

४. दावा मिळकतीमधील विजेचे लाईट बिलचे प्रमाणित प्रत– निशाणी ५०,

५. दावा मिळकतीची कर पावतीची प्रमाणित प्रत– निशाणी ५१,

६. दुकान परवाना मिळणेबाबतचे सुचना पावती व त्याबाबतच्या अर्जाची प्रमाणित प्रत– निशाणी ५२ ते ५३,

७. प्रतिवादी क्र.१ यांचे दि. १८.०२.२०१५ रोजीच्या प्रतिज्ञा पत्राची छायांकित प्रत–आर्टिकल–ए,

८. प्रतिवादी क्र.१ यांनी केलेल्या दि. ०५.०९.२०१५ रोजीच्या अर्जाची प्रमाणित प्रत– निशाणी ५४, व

९. नगर भुमापन अधिकार क्र.२ यांचे कार्यालयाने दावा मिळकतीबाबत पारीत केलेल्या फेरफार ची छायांकित प्रत– आर्टिकल–बी.

प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा पुरावा नि. ५६ वरील पुरसीस नुसार बंद केला. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे मार्फत कोणताही पुरावा देण्यात आलेला नाही व त्यांचा पुरावा नि. ०१ वरील आदेशाने बंद करण्यात आला आहे.

७. वादी तर्फे विधिज्ञ श्री.ए.एच.खान यांचा युक्तीवाद ऐकला. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांचे विधीज्ञ यांनी नि. ५८ वर दाखल केलेल्या लेखी युक्तीवादाचे अवलोकन केले. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे मार्फत युक्तीवाद करण्यात आला नाही.

८. वादी तर्फे विधिज्ञ यांनी त्यांच्या युक्तीवादामध्ये असे नमुद केले आहे की, प्रस्तूत दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये वादी यांचा कायदेशीर हक्क व हिस्सा असतांना प्रतिवादी क्र.२ म्हणजेच वादी यांच्या आईने दावा मिळकतीचे बेकायदेशीर खरेदीखत हे वादी हे कायदयाने सज्ञान झाले नसतांना प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिले असल्याचे व ते वादी यांच्यावर बंधनकारक नसल्याचे आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द करण्यात आले आहे. तसेच, सदरील खरेदीखताबाबत वादी व प्रतिवादी क्र.३ यांचा दावा मिळकतीमध्ये कायदेशीर हक्क असतांना व सदरील खरेदीखत झाले त्यावेळी ते सज्ञान नसतांना कायदयाप्रमाणे आवश्यक असणारी न्यायालयाची परवानगी न घेता ते करण्यात आले असल्यामुळे ते वादी यांच्यावर बंधनकारक नसल्याचे प्रस्तुत दाव्यात सिध्द झाले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यात वादी यांनी वादातील खरेदीखता आधारे प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जे हक्कास हरकत करत असल्याचे व ते दावा मिळकत हस्तांतरीत करण्याच्या प्रयत्नात असल्याचे देखील आवश्यक त्या

पुराव्यानिशी सिध्द केले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/३ हिस्सा असल्याचे सिध्द करण्यात आले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा मंजूर होण्यास पात्र असून तो मंजूर करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

९. प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे लेखी युक्तीवादामध्ये असे नमुद केले आहे की, दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीखत हे कायदेशीर नसल्याचे व ते वादी यांचे वर बंधनकारक नसल्याचे प्रस्तुत दाव्यात वादी यांचे मार्फत आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द करण्यात आलेले नाही. याउलट दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीखत हे पूर्णपणे कायदेशीर असल्याचे व त्या आधारे दावा मिळकतीस प्रतिवादी क्र.१ यांचे नाव मालक म्हणून लागले असून ते दावा मिळकतीचे कायदेशीर मालक झाले असल्याचे प्रस्तुत दाव्यात सिध्द झाले आहे. तसेच, प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी दाखल केलेला नाही व त्यास मुदत अधिनियमाची बाधा येत असल्याचे सिध्द होते. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य कोणतीही मिळकत नसून वादी यांनी दावा मिळकतीमधून प्रतिवादी क्र. १ यांना बेकायदेशीरपणे हाकलून लावून प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला असल्याचे प्रस्तुत दाव्यात सिध्द झाले आहे. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा खारीज होण्यास पात्र असल्यामुळे तो खारीज करण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

१०. प्रस्तुत दाव्यातील वादी व प्रतिवादी यांचे कथनांचे आधारे या न्यायालयाने दाव्याच्या निर्णयाकरीता खालील मुद्दे नि. १९ वर निश्चीत केले आहेत. त्यावरती खालील नमूद कारणास्तव निष्कर्ष नोंदविण्यात येतो.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| **१.** | वादी हे दावा मिळकत ही प्रस्तुत दाव्यामध्ये नमुद केल्याप्रमाणे त्यांची वडीलोपार्जित मिळकत असल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| **२.** | वादी हे प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीखत क्र. ४१३२/१४ हे बेकायदेशीर असल्याचे व ते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| **३.** | वादी हे प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीचे कब्जे हक्कातून त्यांना बेदखल करण्याचा प्रयत्न करत असल्याचे व प्रतिवादी क्र. १ हे दावा मिळकत हस्तांतरीत करण्याचा प्रयत्न करत असल्याचे सिध्द करतात काय ? | होकारार्थी |
| **४.** | वादी हे मागणी केल्याप्रमाणे जाहीरनामा व मनाई हुकुम मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| **५.** | वादी हे मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीचे वाटप होवुन मिळण्यास पात्र आहेत काय ? | होकारार्थी |
| **६.** | काय आदेश व हुकूमनामा ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

**विचारार्थ बाब मुद्दा क्र.१ ते ५ करीता –**

११. मुद्दा क्र.१ ते ५ हे एकमेकांशी सलग्न असल्यामुळे त्याची कारणमिमांसा एकत्रीत चर्चीलेली आहे.

१२. वादींतर्फे साक्षीदार क्र.१ –प्रणय रविन्द्र टाकळीकर– वादी यांनी त्यांचे नि. २३ वरील पुरावा शपथपत्रात प्रस्तुत दाव्यातील मजकुराची पुनरावृत्ती केलेली आहे. सदरील कथनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरील मजकुर पुन्हा या ठिकाणी नमुद करण्यात येत नाही. तसेच, त्यांनी त्यांच्या पुढील सरतपासामध्ये प्रस्तुत दाव्यातील नि.२६ ते ३४ व आर्टिकल–ए वर दाखल केलेली कागदपत्रे बरोबर

असल्याचे सांगितले आहे.

१३. सदरील साक्षीदार यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादातील घर हे आरसीसी बांधकामाचे असल्याचे त्यांनी मान्य केले. वादातील घर खरेदी करण्यापूर्वी ते कच्चे बांधकामाचे होते हे त्यांनी नाकारले. त्यांचे वडील सन २०१० मध्ये मयत झाले असे त्यांनी सांगितले. त्यांच्या वडीलांचा कपडे विक्रीचा व्यवसाय होता असे त्यांनी सांगितले. प्रतिवादी क्र.२ ह्या घरामध्ये मोलमजुरीचे काम करण्यास जात होत्या असे त्यांनी सांगितले. प्रतिवादी क्र.२ यांचा त्यांच्या वडीलांच्या मृत्यूनंतर विवाह झाल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा त्यांनी प्रस्तूत दाव्यात दाखल केलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे वडीलांचे मृत्यूनंतर देखील प्रतिवादी क्र.२ या घरामध्ये मोलमजुरीचे कामास जात होत्या असे त्यांनी सांगितले. वादातील घराचे बांधकाम हे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या स्वतःच्या खर्चाने केले असल्याचे त्यांनी नाकारले. प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांच्या विरुध्द वादातील मिळकतीबाबत कोणतीही तक्रार पोलिसांकडे केलेली नसल्याचे त्यांनी सांगितले. सन २०२२ मध्ये वादातील खरेदीखताची माहिती त्यांना झाली त्यावेळी त्यांचे प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेशी चांगले संबंध होते असे त्यांनी सांगितले. निशाणी क्र.२८ व २९ वरील खोट्या तक्रारी त्यांनी प्रतिवादी क्र.१ विरुध्द दाखल केल्या आहेत हे त्यांनी नाकारले. निशाणी क्र.३० वरील खोट्या आशयाचे नोटीस त्यांनी प्रतिवादी क्र.१ व २ यांना पाठविले असल्याचे त्यांनी नाकारले. नगर भुमापन अधिकारी क्र.२, नागपूर यांच्याकडे दावामिळकतीबाबतचा वाद प्रलंबित असल्याचे त्यांनी मान्य केले. निशाणी क्र.५ वर प्रस्तूत दाव्यात झालेला आदेश प्रतिवादी क्र.१ यांनी आव्हानीत केला असून ते अपील प्रलंबित असल्याचे त्यांनी मान्य केले. वादातील घराचे बांधकाम प्रतिवादी क्र.१ याने केल्यानंतर तो वादातील घरामध्ये राहत होता हे त्यांनी नाकारले. ते निर्मला उर्फ बबिता छत्रपाल

दिघोरीकर हिला ओळखतो, ती त्यांची आत्या असल्याचे त्यांनी सांगितले. वादातील घराच्या मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.२ व सदरील बबिता यांच्यामध्ये वाटपपत्र करण्यात आले असल्याचे त्यांनी मान्य केले. त्यानुसार वाटपामध्ये बबिता हिला मिळालेल्या मिळकतीमध्ये तिने तिचे घर बांधले असून ती तिथे राहत असल्याचे त्यांनी मान्य केले. प्रतिवादी क्र.२ यांना वादातील मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याचा कायदेशीर अधिकार होता हे त्यांनी नाकारले. त्यामुळे प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले वादातील घरमिळकतीचे खरेदीखत कायदेशीर असल्याचे त्यांनी नाकारले. सदरील खरेदीखत झाल्यानंतर ते व सर्व प्रतिवादी हे वादातील घरमिळकतीमध्ये एकत्र राहत होतो हे त्यांनी नाकारले. सन २०२२ मध्ये सदरील खरेदीखताची माहिती त्यांना झाल्यानंतर त्यांचे प्रतिवादी क्र.१ सोबत असणारे संबंध बदलले व त्यानंतर त्यांनी त्याचे विरुध्द खोट्या तक्रारी दाखल करुन त्याला वादातील घरमिळकतीमधून बाहेर काढले हे त्यांनी नाकारले. प्रतिवादी क्र.१ यास वादातील घरमिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकत राहण्यासाठी नसल्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी प्रस्तूतचा खोटा दावा प्रतिवादी क्र.१ च्या विरुध्द दाखल केला असल्याचे त्यांनी नाकारले. प्रस्तूत दाव्यामध्ये ते खोटी साक्ष देत असल्याचे त्यांनी नाकारले.

१४. प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१–नारायण चैतराम कुंभारे– यांनी त्यांचे नि. ४२ वरील पुरावा शपथपत्रात असे नमुद केले आहे की, त्यांचे प्रस्तुतचे पुरावा शपथपत्रातील मजकुर बरोबर आहे. नि. ४७ वर दाखल खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ ची प्रमाणित प्रत व खरेदीखतामधील मजकुर बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ४८ वर दाखल नामांतर इतला या कागदपत्राची प्रमाणित प्रत बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ४९ वर दाखल फेरफारबाबतची सुचनेची प्रमाणित

प्रत ती त्यांना व वादी यांच्या आईला देण्यात आली असून ती बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ५० वर दाखल विजेचे बिल बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ५१ वर दाखल दावा मिळकतीची कर पावती बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ५२ ते ५३ वर दाखल दुकान परवाना मिळणेबाबतचे सुचना पावती व त्याबाबतच्या अर्जाची प्रमाणित प्रत बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. आर्टिकल–ए वर दाखल त्यांचे प्रतिज्ञा पत्राची छायांकित प्रत बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. नि. ५४ वर दाखल अर्जाची प्रमाणित प्रत बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. आर्टिकल–बी वर दाखल नगर भुमापन अधिकार क्र. २ यांचे कार्यालयाने पारीत केलेला फेरफार ची छायांकित प्रत बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले.

१५. सदरील प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. १–नारायण चैतराम कुंभारे–प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये रविन्द्र टाकळीकर यांना दोन मुले नामे प्रणय व टिना असे आहेत असे त्यांनी सांगितले. रविन्द्र टाकळीकर हे मयत झाले त्यावेळी टिना ही ७ वर्षाची व प्रणय हा ९ वर्षाचा होता असे त्यांनी सांगितले. प्रतिवादी क्र. २ ही रविन्द्र टाकळीकर यांची पत्नी होती असे त्यांनी सांगितले. रविन्द्र टाकळीकर मयत झाल्याची तारीख त्यांना सांगता येणार नसल्याचे त्यांनी सांगितले. रविन्द्र टाकळीकर हे त्यांचे मृत्यूपर्यत दावा मिळकतीमध्ये राहत होते हे त्यांनी मान्य केले. रविन्द्र टाकळीकर यांचे मृत्यूनंतर दावा मिळकतीमध्ये वादी हे त्यांच्या आई व बहीणीसह राहत होते हे त्यांनी मान्य केले. दावा मिळकत ही रविन्द्र टाकळीकर यांच्या मालकीची होती व त्यांचे मृत्यूनंतर दावा मिळकतीस वादी, त्यांची आई व बहीण टिना यांचे नाव नामांतरण होवून लागले असल्याचे त्यांनी मान्य केले. वादी यांचे वडील मयत झाले त्यावेळी वादी हे कायदयाने सज्ञान नसल्यामुळे त्यांना मिळकतीबाबत कागदपत्राबाबत काही कळत नव्हते हे त्यांनी मान्य केले. त्यांनी दावा मिळकत ही

त्यांचा प्रतिवादी क्र. २ यांच्या बरोबर विवाहा झाल्यानंतर काही वर्षापूर्वी खरेदी केली असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचा सदरील विवाह दि. ०४.०८.२०१४ रोजी झाला असल्याचे त्यांनी सांगितले. रविन्द्र टाकळीकर हे सन २०११ मध्ये मयत झाले आहेत हे त्यांनी मान्य केले. त्यांचा वादी यांचे आई बरोबर झालेला विवाहा हा दुसरा असून त्यांची पहिली पत्नी छाया हयात असून तिला त्यांच्यापासून मुले नामे दिपक, प्रविण व रोशनी असे जन्मले आहेत असे त्यांनी सांगितले. त्यांचा व त्यांची पत्नी छाया यांच्यामध्ये कायदेशीर घटस्फोट झालेला नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी स्वतःहुन ती त्यांना सन २०१३ मध्ये सोडून गेली असल्याचे सांगितले. त्यांचे स्वतःचे घर बिनाकी मंगळवारी, नागपूर येथे असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याशी कोराडी मंदिर येथे लग्न केले असून ते त्यांनी दोघांनी मिळून केले असल्याचे त्यांनी सांगितले. सदरील विवाहाची नोंदणी त्यांनी केलेली नसल्याचे त्यांनी सांगितले. सदरील विवाहाची त्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये ते अविवाहीत असल्याचे नमुद केले असल्याचे त्यांनी मान्य केले. प्रतिवादी क्र. २ यांचा त्यांच्याशी विवाहा होण्यापूर्वी त्या वादी व प्रतिवादी क्र. ३ यांची पूर्णपणे देखभाल करत होत्या व त्यानंतर त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले हे त्यांनी नाकारले. वादातील दावा मिळकत त्यांनी खरेदी करण्यापूर्वी प्रतिवादी क्र. २ ही वादी व प्रतिवादी क्र. ३ यांची आई व पालन कर्ता असल्याची माहीती होती असे त्यांनी सांगितले. प्रतिवादी क्र. २ यांना दावा मिळकत विक्री करण्याचा कायदेशीर अधिकार आहे का याबाबत त्यांनी माहीती घेतली नव्हती असे त्यांनी सांगितले. ते आनंद कृष्णराव गुमगावकर व रामेश्वरी आनंद गुमगावकर यांना ते ओळखतात असे त्यांनी सांगितले. सदरील आनंद हा त्यांचा मोठा भाऊ मारोती याचा जावई व रामेश्वरी ही सदरील मारोतीची मुलगी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे त्यांच्याशी चांगले सबंध आहेत व वादातील खरेदीखतावर त्यांनी त्यांना साक्षीदार केले

असल्याचे त्यांनी मान्य केले. वादातील प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीचे त्यांना करुन दिलेले खरेदीखत हे खोटे व बेकायदेशीर असल्याचे त्यांनी नाकारले. वादातील खरेदीखत हे दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचा देखील कायदेशीर हिस्सा असतांना त्यांचे समंतीविना करण्यात आले नसल्याचे त्यांनी मान्य केले. सन २०२३ मध्ये वादी यांनी वादातील खरेदीखताबाबत त्यांच्याकडे विचारणा केली होती हे त्यांनी नाकारले. वादातील खरेदीखताबाबत दावा मिळकतीमधील वादी व प्रतिवादी क्र. ३ यांच्या असणा–या हक्काबाबत मा. जिल्हा न्यायालय, यांची पूर्व परवानगी घेण्यात आलेली नसल्याचे त्यांनी मान्य केले. वादातील खरेदीखत हे त्यांनी साक्षीदार यांच्याशी संगनमत करुन बेकायदेशीरपणे करुन घेतले असल्याचे त्यांनी नाकारले. वादातील खरेदीखत हे वादी व प्रतिवादी क्र. ३ यांच्यावर बंधनकारक नसल्याचे त्यांनी नाकारले. वादी यांनी त्यांना दिलेली दि. ०६.०९.२०२२ रोजीची नोटीस मिळाली होती असे त्यांनी सांगितले. तेव्हा पासून आज पर्यत वादी दावा मिळकतीमध्ये राहत असल्याचे त्यांनी मान्य केले. ऑगस्ट २०२२ व सप्टेंबर २०२२ मध्ये त्यांनी वादी यांना दमदाटी करुन दावा मिळकत खाली करण्यास सांगितले होते हे त्यांनी नाकारले. त्याबाबत वादी यांनी त्यांच्या विरुध्द पोलीसांकडे तक्रार दिली होती हे त्यांनी मान्य केले. वादी यांनी सन २०२२ पर्यत दावा मिळकतीचा कर भरला असल्याचे त्यांनी मान्य केले. दावा मिळकतीबाबत वादी यांनी भुमीअभिलेख विभागाकडे अपील दाखल केले असल्याचे त्यांनी नाकारले. वादातील खरेदीखतास वादी यांच्या वडीलांची आई यांनी संमती दिल्याबाबतचा कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले. दावा मिळकतीमध्ये बांधकाम करण्यासाठी त्यांनी महानगरपालिकेची परवानगी घेतलेबाबतची कागदपत्रे प्रस्तुत दाव्यात दाखल केलेली नाहीत असे त्यांनी सांगितले. दावा मिळकतीमध्ये त्यांनी बांधकाम केलेबाबतचा कागदोपत्री पुरावा प्रस्तुत दाव्यात

दाखल केलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. दावा मिळकतीमध्ये त्यांनी बांधकाम केलेले नसून त्यांनी दावा मिळकतीमध्ये बांधकाम केले असल्याचे त्यांचे पुरावा शपथपत्रात खोटे नमुद केले असल्याचे त्यांनी नाकारले. प्रतिवादी क्र.२ यांचे कडून दावा मिळकतीचे जे त्यांनी खरेदीखत करुन घेतले आहे ते पूर्णपणे खोटे व बेकायदेशीर असल्याचे त्यांनी नाकारले. त्यांचे पुरावा शपथपत्रातील सर्व मजकुर खोटा असून त्यांनी प्रस्तुत दाव्यात खोटी साक्ष देत असल्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी सध्यात्यांचे पहिल्या पत्नीच्या मुला सोबत राहत असल्याचे त्यांनी नाकारले. त्यांनी स्वतःहुन त्यांनी स्वतः बांधलेल्या हनुमान मंदिरामध्ये राहत असल्याचे सांगितले.

१६. प्रस्तुत दाव्यात दाखल वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे मार्फत देण्यात आलेल्या तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता वादी तर्फे साक्षीदार क्र.१– प्रणय टाकळीकर– वादी यांनी त्यांचे त्यांचे पुरावा शपथपत्रात त्यांचे वडील रविंन्द्र टाकळीकर दि. १२.०९.२०११ रोजी मयत झाले असून प्रतिवादी क्र. २ ही त्यांची आई व प्रतिवादी क्र. ३ ही त्यांची बहीण असून प्रतिवादी क्र. २ यांनी त्यानंतर प्रतिवादी क्र.१ यांचे बरोबर दुसरा विवाह केला असल्याचे व दावा मिळकतीमध्ये ते व प्रतिवादी क्र. २ व ३ हे राहत असल्याचे नमुद केले आहे. तसेच, त्यांनी त्यामध्ये त्यांना ऑगस्ट २०२२ मध्ये प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र. १ यांनी करुन दिलेले खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ ची प्रत नगर भुमापन कार्यालयातून काढल्यानंतर झाल्याचे व दावा मिळकतीमध्ये त्यांचा १/३ हिस्सा असतांना सदरील खरेदीखत हे प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना बेकायदेशीरपणे करुन दिले असल्याचे त्यांना समजल्याचे नमुद केले आहे. तसेच, त्यांनी त्यामध्ये त्याबाबत त्यांनी प्रतिवादी क्र. १ व २ यांना दि. ०६.०९.२०२२ रोजीची नोटीस पाठवल्याचे व प्रतिवादी क्र. १ यांनी दि. २८.०८.२०२२,

३०.०८.२०२२ व ०९.०९.२०२२ रोजी त्यांना दमदाटी करुन दावा मिळकतीचा ताबा त्यांच्याकडून बळजबरीने घेण्याचा प्रयत्न केल्याचे व त्याबाबत त्यांनी पोलीसांकडे तक्रार दिल्याचे नमुद केले आहे.

१७. वादी तर्फे साक्षीदार क्र.१– प्रणय टाकळीकर यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये प्रतिवादी क्र. २ यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द दावा मिळकतीबाबत कोणतीही तक्रार पोलीसांकडे केली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासात वादातील खरेदीखताची त्यांना माहीती झाली त्यावेळी त्यांचे प्रतिवादी क्र. २ व ३ यांच्याशी चांगले संबंध असल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी त्यांचे उलटतपासामध्ये नगर भुमापन अधिकारी क्र.२ नागपूर यांच्याकडे दावा मिळकतीचा वाद प्रलंबित असल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांचे उलटतपामध्ये दावा मिळकतीमधील घराचे बांधकाम प्रतिवादी क्र.१ यांनी केल्याचे व दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. १ हे राहत होते हे त्यांनी नाकारले आहे. तसेच, त्यांनी त्यांचे उलटतपामध्ये वादातील दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.२ व बबीता दिघोरकर यांच्यामध्ये वाटप पत्र करण्यात आल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांचे उलटतपामध्ये दावा मिळकतीचे खरेदीखत करुन देण्याचा प्रतिवादी क्र.२ यांना कायदेशीर अधिकार असल्याचे व सदरील त्यांनी प्रतिवादी क्र. १ यांना करुन दिलेले वादातील खरेदीखत हे कायदेशीर असल्याचे नाकारले आहे. तसेच, त्यांनी त्यांचे उलटतपामध्ये त्यांनी खोटया तक्रारी प्रतिवादी क्र. १ यांच्या विरुध्द दाखल करुन त्यांना दावा मिळकतीमधून बाहेर काढल्याचे नाकारले आहे.

१८. प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१– नारायण कुंभारे – प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे पुरावा शपथपत्रामध्ये प्रतिवादी क्र.२ यांनी त्यांना आर्थिक अडचण असल्यामुळे

त्यांचे व वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे कल्याणासाठी व कायदेशीर गरजेसाठी त्यांना दावा मिळकत ही वादातील खरेदीखताने विक्री केली असून त्याबाबत झालेले खरेदीखत हे कायदेशीर असून वादी यांनी त्यांना पाठवलेल्या नोटीसीस त्यांनी नोटीस उत्तर दिले आहे. तसेच, त्यांनी त्यामध्ये सदरील खरेदीखतानुसार ते दावा मिळकतीचे कायदेशीर मालक झाले असून त्यांचा प्रतिवादी क्र.२ यांचे बरोबर झालेला विवाहा का कायदेशीर नाही कारण सदरील विवाहा झाला त्यावेळी ते विवाहीत होते व त्यांची पत्नी हयात होती असे नमुद केले आहे. तसेच, त्यांनी त्यामध्ये दावा मिळकत विक्री करण्याचा प्रतिवादी क्र.२ यांना पूर्णपणे कायदेशीर अधिकार असल्याचे नमुद केले आहे.

१९. सदरील साक्षीदार यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादी यांचे वडील हे सन २०११ मध्ये मयत झाल्याचे मान्य करुन त्यावेळी वादी यांचे वय ९ वर्षे असल्याचे सांगितले. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये दावा मिळकत ही रविन्द्र टाकळीकर यांचे मालकीची होती व त्यांच्या मृत्यूनंतर दावा मिळकतीस वादी व प्रतिवादी क्र. २ व ३ यांचे नाव लागल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादी यांचे वडील मयत झाले त्यावेळी वादी हे कायदयाने सज्ञान नसल्यामुळे त्यांना मिळकतीचे कागदपत्राबाबत काही समजत नसल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांचा विवाह हा दि.०४.०८.२०१४ रोजी झाल्याचे व त्यापूर्वी त्यांनी दावा मिळकत खरेदी केली असल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांचे स्वतःचे बिनाकी मंगळवारी, नागपूर येथे घर असल्याचे व ते स्वतः बांधलेल्या हनुमान मंदिरामध्ये राहत असल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी प्रतिवादी क्र.२ ही वादी व प्रतिवादी क्र.३ यांची आई व पालन कर्ता असल्याची त्यांना माहीती असल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये दावा मिळकत विक्री करण्याचा

प्रतिवादी क्र. २ यांना कायदेशीर अधिकार आहे का याबाबत त्यांनी माहीती घेतली नसल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादातील खरेदीखताबाबत दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचे असणा–या हक्काबाबत त्यांनी मा. जिल्हा न्यायालय यांची पूर्व परवानगी घेण्यात आली नसल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादातील खरेदीखत हे बेकायदेशीर असून ते वादी व प्रतिवादी क्र.३ यांच्यावर बंधनकारक नसल्याचे नाकारले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये दि. ०६.०९.२०२२ रोजीची नोटीस त्यांना मिळाल्यापासून ते दावा मिळकतीमध्ये राहत नसल्याचे त्यांनी मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये ऑगस्ट २०२२ व सप्टेंबर २०२२ मध्ये त्यांनी वादी यांना दमदाटी करुन दावा मिळकत खाली करण्यास सांगितल्याचे नाकारले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये त्याबाबत वादी यांनी त्यांच्या विरुध्द तक्रार दिल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादी यांनी सन २०२२ पर्यत दावा मिळकतीचा कर भरत असल्याचे मान्य केले आहे. तसेच, त्यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये वादातील खरेदीखतास वादी यांच्या वडीलांची आई यांनी संमती दिल्याचा व दावा मिळकतीमध्ये त्यांनी बांधकाम केलेबाबतचा कागदोपत्री पुरावा त्यांच्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले आहे.

२०. प्रस्तुत दाव्यात नि. ४७ व ३३ वर दाखल वादातील खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ चे अवलोकन केले असता त्यामध्ये वादी यांचे वडील हे दि. १२.०९.२०११ रोजी मयत झालेबाबत त्यांचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच, सदरील खरेदीखतामध्ये वादी यांचे वय १० वर्षे असल्याचे नमुद करण्यात आले आहे. त्यामुळे सदरील खरेदीखत झाल्यानंतर वादी हे सन २०२२ मध्ये सज्ञान झाले असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी त्यांचे

वय २० वर्षे असल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे वादातील खरेदीखत झाले त्यावेळी वादी व प्रतिवादी क्र. ३ हे कायदयाने सज्ञान नसल्याचे दिसून येते. त्यामुळे प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी ते सज्ञान झाल्यानंतर मुदतीत दाखल केला असल्याचे दिसून येते.

२१. तसेच, नि. ४७ व ३३ वरील वादातील खरेदीखतामध्ये वाटणीपत्र दस्त क्र. ४२२९/२०१३ हा दाखल करण्यात आल्याचे दिसून येते व सदरील दस्त हा प्रस्तुत वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ निर्मला उर्फ बबीता दिघोरीकर यांच्यामध्ये करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच, त्यामध्ये निर्मला दिघोरीकर यांची आई व प्रस्तुत प्रतिवादी क्र. २ यांची सासू यांचे जीवनमान असे पर्यत त्यामध्ये नमुद मिळकत दोन्ही पार्टीला विकता येणार असल्याचे नमुद करण्यात आले आहे. तसेच, सदरील खरेदीखतामध्ये प्रतिवादी क्र.२ यांची सासू कमलाबाई टाकळीकर यांचे दि. २४.०७.२०१३ रोजीचे प्रतिज्ञापत्र जोडण्यात आले असल्याचे व ते त्यांनी दावा मिळकत असलेल्या मिळकतीस वादी, प्रतिवादी क्र. १ व २ व निर्मला दिघोरिकर यांचे नाव लावणेबाबत करुन दिले असल्याचे दिसून येते.

२२. तसेच, सदरील खरेदीखत हे प्रस्तुत प्रतिवादी क्र.१ यांनी वादी व प्रतिवादी क्र.१ यांचे अज्ञान पालनकर्ता म्हणून व स्वतः तर्फे प्रतिवादी क्र. २ यांना करुन दिले असल्याचे दिसून येते. तसेच, सदरील खरेदीखतामध्ये नमुद दावा मिळकतीमधील प्रस्तुत वादी व प्रतिवादी क्र. ३ यांचा हिस्सा विक्री करण्याबाबत मा. जिल्हा न्यायालयाची परवानगी घेण्याबाबतची कोणतीही कागदपत्रे दाखल केले नसल्याचे दिसून येते. तसेच, प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१– नारायण कुंभारे यांनी त्यांच्या उलटतपासात वादातील खरेदीखताबाबत वादातील वादी व प्रतिवादी क्र.३ यांचे असणा–या हक्काबाबत मा. जिल्हा न्यायालय यांची पूर्व परवानगी घेण्यात आली

नसल्याचे मान्य केले आहे. तसेच, हिंदू अज्ञानत्व व पालकत्व अधिनियम १९५६ चे कलम ८ नुसार अज्ञान मुलाचे मिळकतीची हस्तांतरण अथवा विक्री ही नैसर्गिक पालकास मा. जिल्हा न्यायालयाचे परवानगीशिवाय करता येत नसल्याची तरतुद नमुद आहे. तसेच, त्यामध्ये त्याबाबतची परवानगी ही केवळ आवश्यक त्या गरजेच्या वेळी व अज्ञान मुलाचे फायदयासाठी घेता येत असल्याची तरतुद नमुद आहे. त्यामुळे एकंदरीत वादातील खरेदीखताने प्रतिवादी क्र.२ यांनी दावा मिळकतीमध्ये वादी व प्रतिवादी क्र.३ यांचा हक्क असतांना व खरेदीखत झाले त्यावेळी ते सज्ञान नसतांना मा. जिल्हा न्यायालय यांची त्याबाबत आवश्यक ती असणारी पूर्व परवानगी न घेता करण्यात आल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी सदरील खरेदीखत हे आव्हानीत केले असून ते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे नमुद केले आहे. त्यामुळे वादातील खरेदीखत हे वादी यांच्याबाबतीत रद्द करण्यायोग्य (voidable)असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. २ व ३ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये प्रस्तुतचा दावा मंजूर करण्यास त्यांची हरकत नसल्याचे नमुद केले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादातील खरेदीखत हे प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना वादी व प्रतिवादी क्र.३ यांचे कल्याणासाठी व त्यांचे गरजेसाठी करुन दिलेबाबतचा कोणताही विश्वसनीय पुरावा हा प्रतिवादी क्र. १ यांचे मार्फत देण्यात आलेला नाही. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचा पहिला विवाहा अस्तित्वात असतांना त्यांनी प्रतिवादी क्र. २ यांच्याशी बेकायदेशीर विवाह केला असल्याचे प्रतिवादी क्र. १ यांचे प्रस्तुत दाव्यातील कैफियतीवरुन दिसून येते. तसेच, प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये त्यांची दावा मिळकती व्यतिरिक्त अन्य मिळकत नसल्याचे नमुद केले आहे. परंतु, त्यांनी त्यांचे उलटतपासात बिनाकी मंगळवारी नागपूर येथे त्यांची मिळकत असल्याचे व ते त्यांनी स्वतः बांधलेल्या हनुमान मंदिरामध्ये राहत असल्याचे सांगितले

आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.१ यांनी प्रतिवादी क्र.२ यांची त्यांचे विवाहाबाबत फसवणुक केल्याचे दिसून येते. तसेच, प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे कैफियतीमध्ये दावा व्यतिरिक्त त्यांची अन्य मिळकत नसल्याचे खोटे व चुकीचे नमुद केले असल्याचे दिसून येते. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादातील खरेदीखतानुसार दावा मिळकतीचा ताबा हा प्रतिवादी क्र.१ यांना मिळालेबाबत व दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी घराचे बांधकाम केलेबाबतचा कोणताही विश्वसनीय पुरावा दाखल केलेला नाही. तसेच, वादातील खरेदीखतामध्ये जोडण्यात आलेल्या वाटपपत्रामध्ये दावा मिळकत ही प्रतिवादी क्र.२ यांना त्यांचे सासूच्या हयातीत विक्री करता येणार नाही अशी अट नमुद केलेली असतांना व प्रतिवादी क्र.१ यांची सासू–कमला टाकळीकर ही दि. ०२.०२.२०२६ रोजी मयत झाल्याचे नि. ५९ चे पुरसीस सोबत दाखल केलेल्या त्यांचे मृत्यूप्रमाणपत्राचे छायांकित प्रती नुसार दिसून येते. तसेच, त्याची माहीती प्रतिवादी क्र.१ यांना देखील वादातील खरेदीखत करण्यात आले त्यावेळी असल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरीत प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र. १ यांना करुन दिलेले वादातील खरेदीखत हे कायदेशीर नसल्याचे व ते प्रतिवादी क्र.२ यांनी कायदेशीरपणे प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिले नसल्याचे दिसून येते. तसेच, सदरील खरेदीखत हे त्यामुळे वादी यांच्यावर बंधनकारक नसल्याचे प्रस्तुत दाव्यातील वादी यांचे कथन खरे व विश्वसनीय असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी यांनी वादातील खरेदीखत हे प्रतिवादी क्र.२ यांनी कायदेशीरपणे केले नसल्याचे व ते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द केले आहे.

२३. तसेच, प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र.१– नारायण कुंभारे यांनी त्यांचे उलटतपासात ऑगस्ट २०२२ व सप्टेंबर २०२२ मध्ये त्यांनी वादी यांना दमदाटी करुन दावा मिळकत खाली करण्यास सांगून वादी यांनी त्यांचे विरुध्द तक्रार दिल्याचे

व दावा मिळकतीचा कर वादी यांनी सन २०२२ पर्यत दिल्याचे मान्य केले आहे. तसेच, दावा मिळकत ही वादी यांचे ताब्यात असल्याचे व ती प्रतिवादी यांच्या ताब्यात नसल्याचे प्रस्तुत दाव्यात दिसून येते. तसेच, नि. २८ वर दाखल तक्रारीचे अवलोकन केले असता सदरील तक्रार ही वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांचे विरुध्द दि. २९.०८.२०२२ रोजी दिली असल्याचे व त्यामध्ये प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांना दावा मिळकतीचा कब्जा घेणेबाबत शिवीगाळ व दमदाटी केले असल्याचे नमुद केले असल्याचे दिसून येते. तसेच, नि. २९ वरील तक्रारीचे अवलोकन केले असता सदरील तक्रार ही वादी यांनी प्रतिवादी क्र. १ यांचे विरुध्द नगरभुमापन अधिकारी क्र.२ यांचेकडे दावा मिळकतीचे मालमत्ता पत्रकावरुन कमी करणेबाबत दि. २९.०८.२०२२ रोजी दाखल केली असल्याचे दिसून येते. तसेच, सदरील तक्रारी वादी यांनी दिल्याचे प्रतिवादी क्र.१ यांनी त्यांचे उलटतपासात मान्य केले आहे. तसेच, वादी यांनी प्रतिवादी क्र.१ यांना दावा मिळकतीमधून काढून टाकलेबाबत कोणतीही तक्रार प्रतिवादी क्र.१ यांनी वादी यांचे विरुध्द दिली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरीत वादातील खरेदीखता आधारे प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जास हरकत करत असल्याचे व ते दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे प्रस्तुत दाव्यातील वादी यांचे कथन खरे व विश्वसनीय असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादी यांनी प्रस्तुत दाव्यात दावा मिळकतीमधील त्यांचे कब्जास प्रतिवादी क्र.१ यांनी हरकत व अडथळा करुन त्यांना दावा मिळकतीचे कब्जे हक्कातून बेदखल करण्याचा प्रयत्न केल्याचे आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द केले आहे.

२४. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकत ही वादी यांचे वडीलांचे वडील यांचे मालकीची असल्याचे व ती वडीलोपार्जित असल्यामुळे त्यामध्ये वादी, प्रतिवादी क्र. २ व ३ यांचा प्रत्येकी १/३ हिस्सा असल्याचे दिसून येते. त्यामुळे एकंदरीत

प्रस्तुत दाव्यामध्ये दावा मिळकत ही वडीलोपार्जित असल्याचे व दावा मिळकतीबाबत प्रतिवादी क्र.१ यांना करुन देण्यात आलेले वादातील खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ हे बेकायदेशीर असल्याचे व ते वादी यांच्यावर बंधनकारक नसल्याचे वादी यांनी आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द केले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी प्रतिवादी क्र.१ हे दावा मिळकतीवरील त्यांचे कब्जे हक्कातून त्यांना बेदखल करत असल्याचे व दावा मिळकत विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्याचे देखील वादी यांनी आवश्यक त्या पुराव्यानिशी सिध्द केले आहे. तसेच, प्रस्तुत दाव्यामध्ये वादी यांनी दावा मिळकतीमध्ये त्यांचा १/३ हिस्सा असल्याचे देखील सिध्द केले आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यात वादी हे मागणी केल्याप्रमाणे दावा मिळकतीबाबत झालेले वादातील खरेदीखत क्र. ४१३२/२०१४ हे बेकायदेशीर असून ते त्यांच्यावर बंधनकारक नसल्याचे जाहीर होवून मिळण्यास, दावा मिळकतीबाबत निरंतर मनाई हुकूम मिळण्यास व दावा मिळकतीचे वाटप होवून मिळण्यास पात्र असल्याचे सिध्द होते. त्यामुळे हे न्यायालय मुद्या क्र. १ ते ५ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>विचारार्थ बाब मुद्दा क्र.६ करीता</u> –**

२५. या न्यायालयाने विचारार्थ बाब मुद्दा क्र.१ ते ५ बाबत नोंदविलेल्या निष्कर्षांचे आधारे प्रस्तुतचा दावा हा खर्चासह मंजूर होण्यास पात्र आहे. त्यामुळे मुद्दा क्र.६ बाबत हे न्यायालय खालील प्रमाणे आदेश पारीत करत आहे –

| **आदेश** | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा दावा हा खर्चासह मंजूर करण्यात आला. |
| २. | दावा मिळकतीचे प्रतिवादी क्र.२ यांनी प्रतिवादी क्र.१ यांना करुन दिलेले खरेदीखत क्र.४१३२/२०१४ हे बेकायदेशीर |

| | |
|---|---|
| | असल्याचे व ते वादी यांच्यावर बंधनकारक नसल्याचे व दावा मिळकतीमध्ये वादी यांचा १/३ हिस्सा असल्याचे जाहीर करण्यात आले. |
| ३. | प्रतिवादी क्र.१ यांनी दावा मिळकतीमधील वादी यांचे कब्जे हक्कास हरकत व अडथळा करु नये व दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करु नये असा निरंतर मनाई हुकुम पारीत करण्यात आला. |
| ४. | दावा मिळकतीचे वाटप हे कोर्ट कमिशनर यांची नियुक्ती करुन त्यांच्या मार्फत करण्यात यावे. |
| ५. | येणेप्रमाणे प्राथमिक हुकूमनामा करण्यात यावा. |

MAHESH KRISHNA PATIL
Digitally signed by MAHESH KRISHNA PATIL
Date: 2026.07.13 17:57:10 +0530

( **एम.के.पाटील** )
सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)
नागपूर.

ठिकाण – नागपूर
दिनांक – १३/०७/२०२६

# CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file are in verbatim as per the original order.

Name of Steno - Sau. S.R.Patil (Lr.Gr.Steno)
Name of Court - Jt. CJJD, Nagpur
Uploaded on - 13.07.2026